दिव्य मराठी
चाळीसगाव
08-08-2026

कार्यक्रम • कासोदा येथील आर्यन स्कूलमध्ये सायबर सुरक्षा जनजागृती

प्रात्यक्षिकातून सायबर सुरक्षिततेचे धडे

प्रतिनिधी | कासोदा

डिजिटल युगात मोबाइलचा सुरक्षित वापर, मजबूत पासवर्ड तयार करणे आणि ओटीपी अथवा वैयक्तिक माहिती कोणाशीही शेअर न करण्याचे आवाहन करत सायबर तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना सायबर फसवणुकीपासून सुरक्षित राहण्यासाठी सखोल मार्गदर्शन केले. कासोदा (ता. एरंडोल) येथील आर्यन इंटरनॅशनल स्कूलमध्ये उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व क्विक हील फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने 'सायबर सुरक्षिततेसाठी सायबर शिक्षण' या उपक्रमांतर्गत सायबर सुरक्षा जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे प्राचार्य जितेंद्र गजरे उपस्थित होते. सत्रात सायबर योद्धा टीना सुनील पाटील आणि दर्शना चौधरी यांनी विद्यार्थ्यांना डिजिटल युगातील धोक्यांपासून सुरक्षित राहण्याची माहिती सोप्या भाषेत दिली. फिशिंग लिंक, बनावट सोशल मीडिया अकाउंट, ऑनलाईन गेमिंगमधील धोके, फोटो मॉर्फिंग, डिजिटल अटक आणि फसवणूक या विषयांवर त्यांनी सविस्तर प्रकाश टाकला. मोबाईल हाताळताना येणारे अनोळखी कॉल, एसएमएस किंवा लिंकवर विश्वास न ठेवण्याचा सल्ला यावेळी देण्यात आला.

कासोदा येथे सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम सादर करताना विद्यार्थी.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी \'सायबर सुरक्षित राहू, सुरक्षित भारत घडवू' ही शपथ घेऊन जबाबदार डिजिटल नागरिक बनण्याचा संकल्प केला. या नाविन्यपूर्ण उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत मोठी जागृती निर्माण झाली असून, ही माहिती आपल्या कुटुंबापर्यंत पोहोचवण्याचा निर्धार विद्यार्थ्यांनी व्यक्त केला. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य जितेंद्र गजरे यांनी या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले. आजच्या डिजिटल युगात शालेय वयापासूनच विद्यार्थ्यांना अशा धोक्यांची जाणीव करून देणे अत्यंत गरजेचे असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.